# अहवाल

# राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.)

# नियमीत कार्यक्रम

# २०२१ – २०२२

यशवंत शिक्षण संस्था वर्धा चे संस्थापक स्व. दाआजी उपाख्य बापूरावजी देशमुख यांच्या सामाजिक बांधिलकीतून देवळी परिसरात स्थापन झालेले श्रीमती सविताराणी नारायणदास जावंधिया महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याकरिता सतत प्रयत्नरत असलेले प्रसिद्ध महाविद्यालय आहे. या महाविद्यालयात १९८७ – १९८८ पासून राष्ट्रीय सेवा योजना पथक दरवर्षी स्थापन करण्यात येते. यात एकूण १५० स्वयंसेवकांचा समावेश असतो. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या युवक – युवतींमध्ये सामाजिक कार्याची आवड निर्माण करून एक सामाजिक जाण त्यांच्यात जागृत करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्य करीत असते.

## २१ जून २०२१ आंतरराष्ट्रीय योग दिवस


तरुण भारत
Paschim Vidarbha | 2021-07-01 | Page- 7
epaper.tarunbharat.net

**एसएसएनजे महाविद्यालयात प्राणायाम सराव वर्ग**

◆ **देवळी, ३० जून**
स्थानिक एसएसएनजे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आठ दिवसीय योग सराव वर्गाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील ८० विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यात भाग घेतला.

१४ जूनपासून दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमाने सुरू झालेल्या योगवर्गाचा समारोप २१ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त झाला.

अध्यक्षस्थानी कार्यकारी प्राचार्य डॉ. जी. जी. मालधुरे होते तर योग प्रशिक्षक उमाकांत चौधरी, मनीष देशमुख आणि योग वर्गाचे संयोजक प्रा. संतोष मोहदुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

देह धर्मासाठी जशी आहाराची आवश्यकता असते तशीच आसन प्राणायामाचीसुद्धा शरीर व मनाला गरज असते.

योगा हा सर्व व्यायामात उत्तम मानला जातो. योगाने पूर्ण आरोग्य लाभते आणि कुठल्याही प्रकारचे नुकसान होत नाही. प्राणायाम ही एक सूक्ष्म प्रक्रिया आहे. ज्याद्वारे एखादी व्यक्ती त्याच्या अंतर्गत ऊर्जेवर ताबा मिळवू शकते. या प्रक्रिया अतिशय सखोलतेने शिकविल्या जातात असेच आयोजन करण्यात यावे, असे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.

आठ दिवसीय प्राणायाम सराव वर्ग पूर्ण करणाऱ्यास महाविद्यालयातर्फे ई-प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

◀*(तभा वृत्तसेवा)*

Powered by Bharati Web Pvt Ltd

कोवीड–१९ च्या संक्रमणामुळे सरकारने अनेक निर्बंध लावले. या पार्श्वभुमीवर सामुहिक रीत्या योगासनाचा कार्यक्रम आयोजीत करणे शक्य झाले नाही. तरीही आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व लक्षात घेता आभासी पध्दतीने १४ जून ते २१ जून या कालावधीसाठी दररोज योग सराव वर्ग सकाळी ६ ते ७ वाजेपर्यंत घेण्यात आले. या योग वर्गाला प्राचार्य डॉ. मालधूरे सर उपस्थित होते. श्री. उमाकांत चौधरी व श्री. मनिष देशमुख यांनी या योग सराव वर्गास काही प्रात्यक्षिके करून दाखविली. त्यानुसार इतर सर्वांनी अनुसरण केले. यामध्ये भस्तिका, कपालभाती, अनुलोम–विलोम, उज्जायी, इत्यादी योग क्रिया करण्यात आल्या. तसेच पर्वतासन, ताडासन, भुजंगासन, वज्रासन, विरमुद्रा, इत्यादी योगासने करण्यात आली. या आठ दिवसीय आभासी योज वर्गाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थीवर्ग बहुसंख्येने उपस्थित होते. दररोज शांतीपाठाने सराव वर्गाची सांगता होत होती.

आभासी योग वर्गाला उपस्थित सर्वांकडून Online Feedback Form भरून घेण्यात आले व त्यांना E-Certificate देण्यात आले.



Yeshwant Rural Education Society, Wardha

S.S.N.J. Mahavidyalaya, Deoli Dist- Wardha

INTERNATIONAL YOGA DAY

CERTIFICATE OF PARTICIPATION

This is to Certify that Santosh Devidas Mohadhare, S.S.N.J. Mahavidyalaya, has successfully participated in the "YOGA PRACTICE CLASS" from 14th June to 21th June 2021, organized by N.S.S. UNIT, Deoli.

S.D.MOHADARE
N.S.S. COORDINATOR

DR. G.G. MALDHURE
PRINCIPAL

## १५ ऑगस्ट २०२१ महाविद्यालयीन परिसरात वृक्षारोपन






स्वातंत्र्य दिनानिमीत्त महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने वृक्षारोपनाचा कार्यक्रम पार पडला. वृक्षारोपनाची सुरूवात प्राचार्य डॉ. मालधूरे यांच्या हस्ते करण्यात आली. सोबत प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी यात आपला सहभाग नोंदविला.

वृक्षारोपनाप्रसंगी प्राचार्यांनी सर्वांना उद्बोधन केले. आपण आपल्या परिसरात लावलेल्या झाडांचे संगापनही तेवढेच महत्त्वाचे आहे. तुकाराम महाराजांनी वृक्षवल्ली आम्हा सोयरे । वनचरे का म्हटले? त्याचे महत्त्व आज आपल्याला लक्षात येत आहे. त्यामुळे सर्वांनी हातभार लावावा, असे त्यांनी आवाहन केले.

या कार्यक्रमाला रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष मोहदरे, स. कार्यक्रम अधिकारी प्रा. टी. एम. मॅन्यूअल व अन्य प्राध्यापक उपस्थित होते.

## २४ सप्टेंबर २०२१ – राष्ट्रीय सेवा योजना दिवस

२४ सप्टेंबर रा.से.यो. दिवस म्हणून सर्वत्र साजरा करण्यांत येतो. यावर्षी आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना दिवसाच्या कार्यक्रमाकरिता प्रा. डॉ. प्रभाकर ढाले यांची उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या भाषणातून रा. से.यो. चे महत्त्व विशद केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान निर्माण होते. त्यातून उत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ते निर्माण होऊ शकतात. म्हणून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी रा.से.यो. चे स्वयंसेवक बनावे, असे त्यांनी आवाहन केले. या कार्यक्रमाला रा.से.यो. स्वयंसेवकासोबतच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीही हजर होते. कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष मोहदरे यांनीही प्रसंगोचित मार्गदर्शन केले.

**<u>: रासेयो स्थापना दिनाच्या कार्यक्रमाबाबतची सूचना :</u>**


**राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना सुचित करण्यात येते की २४ सप्टेंबर 'NSS स्थापना दिवस साजरा करण्यात येतो त्यानिमित्त सर्वांना उपस्थित राहणे अनिवार्य आहे.**


या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित राहतील

हा कार्यक्रम ऑनलाइन पद्धतीने गुगल मीट द्वारे होईल याची नोंद सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावी.

दिनांक शुक्रवार २४ सप्टेंबर २०२१ वेळ :. दुपारी १.००

- To join the meeting on Google Meet, click this link:
- https://meet.google.com/tqg-hiet-bsd




**दिनांक २३ ऑक्टोबर, २०२१ वीगन आउटरीच व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने वेबीनारचे आयोजन.**

महाविद्यालयातील रासेयो पथक व वीगन आउटरीच, दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने शाकाहारी आहारविषयक महत्त्व पटवून देण्यासाठी वेबीनार आयोजीत करण्यात आले होते. यात शाकाहारी आहाराचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. रासेयो पथकाचे ८० स्वयंसेवक आभासी पध्दतीने उपस्थित होते.

## ०१ नोव्हेंबर, २०२१ कोवीड–१९ प्रतिबंधात्मक लसिकरण शिबीर




महाराष्ट्र शासनाच्या युवा स्वास्थ्य अभियान अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना तर्फे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता एक दिवसीय कोवीड–१९ प्रतिबंधात्मक लसिकरण शिबीर आयोजीत करण्यांत आले.या शिबीरात ८२ विद्यार्थ्यांनी आपली प्रथम कोवीशिल्ड लस टोचून घेतली.




### २६ नोव्हेंबर २०२१ ला संविधान दिवस साजरा

२६ नोव्हेंबर, संविधान दिवस म्हणून साजरा करण्यांत आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष मोहदरे यांनी केले. सह कार्यक्रम अधिकारी प्रा. टी. एम. मॅन्यूअल यांनी उपस्थित विद्यार्थ्यांकडून संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन करून घेतले. प्रा. लांबट सर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. ते म्हणाले, ''नविन भारत घडविण्याची ताकद भारतीय संविधानात आहे. डॉ. आंबेडकर लिखीत संविधानाने जात, धर्म आणि लिंग भेद मिटवीले आणि प्रत्येकाला विकासाचा मार्ग मोकळा करून दिला.''

या संविधान दिनाच्या निमित्त आयोजीत कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. मालधूरे यांनी आपले अध्यक्षीय भाषण केले.












**११ डिसेंबर, २०२१ रेड रिबन क्लब व एच आय व्ही एड्स जनजागृती कार्यक्रम**

ग्रामीण रूग्णालय, भिडी चे समूपदेशक श्री. विजयजी ओझा यांनी रेड रिबन क्लब चे उद्घाटन केले व एड्स संबंधी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना माहिती दिली.






**११ डिसेंबर, २०२१ रेड रिबन क्लब व एच आय व्ही एड्स जनजागृती कार्यक्रम व गट चर्चा**





**१८ डिसेंबर, २०२१ नियीमत वर्ग व गट चर्चा**






**२५ जानेवारी २०२२ राष्ट्रीय मतदार दिन** :

२५ जानेवारीला राष्ट्रीय मतदार दिवस महाविद्यालयात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष मोहदरे यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ. ढाले सर यांनी भुषविले. यावेळी राष्ट्रीय मतदार दिनाचे महत्त्व पटवून देण्याकरीता राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक यावले सर यांना आमंत्रित करण्यात आले होते. या प्रसंगी निवडणूक प्रक्रियेत तरूणाईचा वाढता प्रभाव हे लोकशाहीला बळकट करणारे आहे, असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे आभार भाग्यश्री कडू या विद्यार्थ्यीनीने मानले.












**दि. १९ फेब्रुवारी, २०२२ छत्रपती शिवाजी महाराज जयंती चा कार्यक्रम घेण्यात आला.**

महाविद्यालयातील प्राध्यापक कक्षात महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून जयंती साजरी करण्यात आली. यात सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी होते.







**दिनांक ८ मार्च २०२२ महिला दिन**

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारा ८ मार्च २०२२ ला जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मालधुरे सर अध्यक्ष होते. मंचावर प्रा. डॉ. ढाले सर, प्रा. डॉ. शेख सर उपस्थित होते. या दिनानिमीत्त महाविद्यालयातील सर्व महिला शिक्षकांचे व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे पुष्पगुच्छाने स्वागत करण्यात आले. या प्रसंगी सर्व प्राध्यापकांनी आपले महिला दिनानिमित्त मनोगत व्यक्त केले.






**दिनांक १८ मार्च ते २४ मार्च २०२२ विशेष श्रमसंस्कार शिबीर**

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर हरीसवाडा पुनर्वसन तालुका देवळी येथे आयोजित करण्यात आले होते. त्यात रोज सकाळी प्रार्थना, दुपारी प्रबोधन सत्र व सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

**शिबीरपुर्व तयारी १७ मार्च २०२२**

